③

Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune-411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व१७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.: 020-25705000 E-mail:- secretary.stateboard@gmail. Fax No.: 020-25665807

क्र.रा.मं/संशोधन/ २४२९
पुणे - ४११ ००४
दिनांक- ०८/०५/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळ.

विषय :-कौशल्य सेतू अभियानमधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत.
संदर्भः- शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एसडी-२ दिनांक २७/०९/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्च २०१९ च्या इयत्ता १०वी च्या परीक्षेसाठी ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ देणेसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थ्यांनी कौशल्य सेतू अभ्यासक्रमांतर्गत ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस् मिळण्यासाठी परिपूर्ण अर्ज शाळेमध्ये सादर करण्याचा कालावधी दिनांक ६/५/२०१९ ते १५/५/२०१९ | शाळांनी विद्यार्थ्यांकडून स्विकारलेले परिपूर्ण अर्ज विभागीय मंडळात सादर करण्याचा कालावधी दिनांक ६/५/२०१९ ते १६/५/२०१९ | विभागीय मंडळांनी शाळांकडून स्विकारलेले अर्ज राज्य मंडळ कार्यालयात दिनांक १७/५/२०१९ पर्यंत सादर करावेत. |

कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस् मिळण्यासाठी शाळांकडून प्राप्त झालेले अर्ज व त्या सोबतची सर्व कागदपत्रे शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुळ कागदपत्रांवरून पडताळणी करून स्वाक्षरीसह प्रमाणित केलेले असावेत.

कृमाप

विभागीय मंडळांनी सदर अर्जांची छाननी करून दिनांक १७/५/२०१९ पर्यंत राज्यमंडळ कार्यालयात एकूण अर्ज, एकूण जमा झालेल्या रक्कमेचा तपशील आणि विद्यार्थ्यांच्या नावांची यादी यासह सादर करावेत.

दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी प्रसिध्दीच्या निवेदनाची प्रत पत्रासोबत देण्यात येत आहे. सदर निवेदनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

प्रत माहितीस्तवः-
व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/268
कोल्हापूर ४१६००४.
दिनांकः-०६/०५/२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

राज्य मंडळाने जा.क्र. रा.मं./संशोधन/२४२१ दि. ०४/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कौशल्य सेतू अभियानामधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.